# घर-व्यवसायातील मदतनीस महिलांचा सत्कार

## महिलांचा सत्कार । रूग्णांसाठी केलेला हा नवीन उपाय

**। डोंबिवली ।** वैद्यकीय व्यवसायातील व्यस्त जीवनशैलीत घर आणि व्यवसायात अमूल्य मदत करणाऱ्या महिलांचा सत्कार महिला डॉक्टरांनी केला. जागतीक महिला दिना निमित्ताने डोंबिवली जिमखाना येथे ओम हॉस्पिटलच्या वतीने सांस्कृतिककार्यक्रम संपन्न झाला. त्यात पाच महिलांचा सत्कार करण्यात आला.

भारती मुळे, पूनम आंबरे, शालन कांबळे, जॉली नायर, कविता सुर्वे या महिलांचा डॉ.वंदना धाकतोडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शल्यचिकित्सक डॉ.धाकतोडे यांच्या ओम हॉस्पिटल मध्ये या महिला




काम करतात. यावेळी डॉ.धाकतोडे म्हणाल्या, डोंबिवलीत सुमारे १८० फॅमिली डॉक्टरांचा एक ग्रुप तयार केला असून दरवर्षी चांगले उपक्रम करीत असतो. या शहरात महिला फॅमिली डॉक्टरांची संख्या जास्त आहे. तसेच घर - व्यवसायातील मदतनीस महिलांचा सत्कार होणे गरजेचे होते असेही त्या म्हणाल्या. अॅलोपथी, आयुर्वेद, होमियोपथी या भिन्न चिकित्सा पध्दतीतील स्त्री डॉक्टर यांनी ओम हॉस्पिटलच्या वतीने आयोजित केलेल्या महिला दिना निमित्ताने एकत्र येत विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

वैद्यकीय व्यवसायातील व्यस्त जीवनशैलीत देखील आपल्यातील कलागुणांची जपवणूक स्त्री डॉक्टरानी केली आहे. या कलागुणांना वाव मिळावा यासाठी ओम हॉस्पिटलच्या वतीने महिला दिन साजरा करण्यात आला. गंभीर चेहऱ्याने रोगाचे निदान करून कडू औषध रूग्णांना देणाऱ्या डॉक्टरांनी ठसकेबाज लावणी सादर करून तर, कव्वालीची नजाकत पेश करीत उपस्थितीतांची मने जिंकली. कला सादर करणाऱ्या डॉक्टराना उत्तेजना देताना सगळ्याच महिला डॉक्टरांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.